## Topic no II

# समाजशास्त्रातील मुलभूत संकल्पना

## Basic Concepts in Sociology

- **सामाजिक आंतरक्रिया : अर्थ आणि प्रकार**
- **समाज - मानवसमाजाचा अर्थ आणि वैशिष्टे**
- **समाजचे प्रकार**

**प्रस्तावना**

भाषा अवगत होण्यासाठी त्या भाषेतील विविध शब्दांचा अर्थ समजणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे समाजशास्त्र समजून घेण्यासाठी समाजशास्त्राची परिभाषा समजली पाहिजे. ही समाजशास्त्रीय परिभाषा विविध समाजशास्त्रीय संकल्पनांनी बनली आहे. समाजशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना या शास्त्रातील विविध संकल्पनांचे नेमके अर्थ समजून होणे आवश्यक आहे. तो अर्थ समजून घेतल्याशिवाय समाजशास्त्र समजून घेता येणारा नाही.

संकल्पना म्हणजे काय ?

एखाद्या गोष्टीचे किंवा प्रक्रियेचे स्वरूप नेमकेपणाने स्पष्ट करण्यास योजिला जाणारा शब्द म्हणजे 'संकल्पना' होय. "शास्त्रात वापरल्या जाणा-या आणि विशिष्ट अर्थ असलेल्या संज्ञा यानांच संकल्पना असे म्हणतात. पॉलिंग यंग यांच्या मते "तथ्यांच्या प्रत्येक पृथक वर्गास की ज्यास इतरांपासून वेगळे नांव, शिर्षक दिले जाते त्यांना संकल्पना असे म्हणतात.

समाजशास्त्रीय, संकल्पना या दैनदिन व्यवहारातील शब्दच असतात. उदा. समाज, समुदाय, संस्कृती, मंडळ इत्यादी. समाजशास्त्रात या शब्दांना एक विशिष्ट अर्थ असतो. संकल्पना अमूर्त असतात. निरीक्षण केलेल्या घटनांचे नेमके स्वरूप व लक्षणे साररूपात व्यक्त करण्यासाठी संकल्पना तयार केल्या जातात.

# सामाजिक आंतरक्रिया (Social Interaction)

सामाजिक आंतरक्रिया हाच संपूर्ण मानवी सामाजिक जीवनाचा आधार आहे. म्हणूनच अनेक समाजशास्त्रज्ञ 'समाजशास्त्र हे सामाजिक आतक्रियांच शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करणारे शास्त्र आहे' अशी समाजशास्त्राची व्याख्या करतात, यावरून सामाजिक अंतराक्रया ही समाजशास्त्रातील एक मध्यवर्ती संकल्पना असल्याचे स्पष्ट होते.

**सामाजिक आंतरक्रियेची व्याख्या स्वरूप-**

१. हिशलेर, व्हायटन आणि हटर यांच्या मते, " जेव्हा एका व्यक्तीच्या क्रियांचा (वर्तनाचा) किमान दुसऱ्या एखाध्या व्यक्तीच्या क्रियांवर प्रभाव पडतो तेव्हा आंतरक्रिया घडून येते."

२. शेपर्ड ओडोम आणि ब्रुटन म्हणतात, " जेव्हा दोन किंवा अधिक व्यक्ती परस्परांचे वर्तन प्रभावीत करतात तेव्हा सामाजिक आंतरक्रिया आस्तित्वात येते".

३. ड्रेसलर आणि विप्लेस यांच्या मते, "जेंव्हा जेव्हा मानवी व्यक्ती इतर व्यक्तींच्या क्रियांना प्रतिक्रिया करतात तेव्हा 'घडून येणाऱ्या प्रक्रियेला मानवी आंतरक्रिया असे म्हणतात."

४. ब्रूम आणि सेल्झनिक यांच्या मतानुसार, "इतरांची जाणीव ठेवून आणि इतरांच्या प्रतिक्रियांशी आपल्या प्रतिक्रिया जुळवून घेऊन वर्तन करण्याच्या प्रक्रियेला सामाजिक आंतरक्रिया म्हणतात".

**सामाजिक आंतरक्रियेच्या पूर्वअटी**

१. सामाजिक आंतरक्रिया अस्तित्वात येण्यासाठी किंमान दोन व्यक्तींची आवश्यकता असते.

२. व्यक्तींना इतरांच्या आस्तीत्वाची जाणीव असणे किंवा एकमेकांची दखल घेणे

आवश्यक ठरते.

३. व्यक्तींनी परस्परांना उद्देशून वर्तन करणे आवश्यक आहे.

४. आंतरक्रियेत इतरांच्या वर्तनाचा अर्थ कळल्यामुळे व्यक्ती त्यास प्रतिसाद देतात.

५. आंतरक्रियेत इतरांच्या प्रतिसादास अनुरूप अशा प्रकारचा प्रतिसाद व्यक्तीं देतात किंवा इतरांच्या वर्तनाला जुळवून घेणारे वर्तन व्यक्तीकडून घडून येते.

६. आंतरक्रियेत दोन किंवा आधिक व्यक्तींत अर्थपूर्ण सामाजिक संपर्क प्रस्थापित होतो.

७. अर्थपूर्ण सामाजिक संपर्कामुळे आंतरक्रियेत सहभागी होणात्या व्यक्तींची वर्तने परस्परांकडून प्रभावित होतात.

८. व्यक्तींच्या वर्तनात थोडयाफार प्रमाणात बदल घडून येतो.

९. अंतक्रिया हि एक सामान्य प्रक्रिया असून तिचे स्वरूप प्रतिकात्मक असते.

एकाने नमस्कार केल्यावर दुस-याने प्रतिनमस्कार करणे, शिक्षकाने प्रश्न विचारल्यावर विद्यार्थ्याने प्रतिसार देणे, पति-पत्नी दोघांनी कौटुंबिक कामात मदत करणे, इत्यादी सामाजिक क्रियांची उदाहरणे आहेत.

## सामाजिक आंतरक्रियेची वैशिष्टये

### १. एकमेकांनी एकमेकांशी वागणे -

एका व्यक्ती वा समूराने दुसया व्यक्ती वा समूहास उद्देशून काही वर्तन केल्यावर ती व्यक्तीही त्याला अनुसरून काही प्रतिक्रिया करते. अशा प्रकारे दोन किंवा आधिक व्यक्ती वा समूहांमध्ये घडून येणाऱ्या परस्परवर्तनाला सामाजिक आंतरक्रिया म्हणतात.

### २. परस्पर उदिपक व परस्पर प्रतिक्रिया -

सामाजिक आंतरक्रियेत एका व्यक्तीचे वर्तन उदीपक (Stimulus) असते तर दुस-या वाक्तीचे वर्तन प्रतिक्रियेच्या (response) स्वरूपाचे असते. उदिपकाशिवाय प्रतिक्रिया नाही व प्रतिक्रियेशिवाय आंतरक्रिया नाही. आपण एखाध्याला काही विचारले व त्याने त्याची काही दखल घेतली नाही (जाणीवपूर्वक नव्हे) तर आंतक्रिया आसीत्वात येणारे नाही. साधारणतः कोणत्याही आंतरक्रियेत उद्दीपकाला केलेली प्रतिक्रिया स्वत: नवीन उदीपक बनवते व त्याला पहिल्या व्यक्तीकडून प्रतिक्रिया होते. म्हणजे आंतरक्रियेत उदीपक व प्रतिक्रिया यांची साखाळी दिसून येते. म्हणून आंतरक्रिया म्हणजे परस्पर उदिपक व परस्पर प्रतिक्रिया होय.

### ३. अर्थपूर्ण सामाजिक संपर्क -

आंतरक्रियेत एकाच्या वर्तनाने दुसऱ्याचे उदीपन होणे याचा अर्थ त्याला पहिल्या व्यक्तीच्या वर्तनाचा अर्थ कळतो. एखाद्या आजारी व्यक्तीला कोणी पुष्पगुच्छ दिला तर ती व्यक्ती त्याचे आभार मानते, या ठिकाणी पुष्पगुच्छ देण्याच्या क्रियेचा अर्थ कळाल्यामुळे आभार मानण्याची प्रातीक्रिया झाली. 'प्रियकराने गुलाबाचे फूल दिल्यावर प्रीयसी हसून त्याचा स्वीकार करते. याचा अर्थ असा की, आंतरक्रियेत दोन अर्थपूर्ण सामाजिक संपर्क प्रस्थापित होतो.

### ४. दुस-यामुळे आपले वर्तन बदलते -

आंतरक्रियेत एकमेकांच्या वर्तनाने एकमेकांचे उदिपन होते, याचाच अर्थ परस्परांचा प्रभाव परस्परांवर पडतो. दुस-याच्या वर्तनाने आपले उदीपन होते, म्हणजेच त्याचा वर्तनाने आपण प्रभावित होतो, हा प्रभाव पडल्यानेच आपले वर्तन बदलते. दुसरा माणूस हसला तर आपणही हसतो पण त्याने

अपशब्द वापरले तर आपल्याला राग येतो. व विविध प्रकारे आपला राग व्यक्त करतो, म्हणजे, आंतक्रियेत दुसऱ्यामुळे आपले वर्तन बदलते.

**५. प्रतीकात्मक स्वरूप-**

आंतरक्रियेत विविध प्रतिकांचा व प्रतिकात्मक प्रक्रियांचा वापर होतो. त्यामुळे सामाजिक आंतक्रियेचे स्वरूप प्रतिकात्मक असते. आंतरक्रियेत इतरांच्या वर्तनाला केवळ यांत्रिकपणे प्रतिक्रिया होत नाही, आंतरक्रिया विशिष्ट सामाजिक परिस्थितीत घडून येते. आंतरक्रियेच्या पूर्वी, भूतकाळात काही घटना घडलेल्या असतात आणि भविष्य काळातही काही घटना घडण्याची शक्यता असते. या सर्वांचा सातत्याने विचार करून इतरांनी वर्तन केल्यावर योग्य त्या संदर्भात त्या वर्तनाचा अर्थ व्यक्ती लावते. अशा प्रकारे अर्थ समजून  घेतल्यावर समोरच्या व्यक्तीशी कसे वागावे हे ठरवण्यासाठी विविध पर्यायी वर्तन प्रकारांची प्रतिकात्मक मध्यस्थी अनुसरली जाते. म्हणून आंतक्रियेचे स्वरूप प्रतिकात्मक असते.

## सामाजिक आंतरक्रियेचे स्तर

सामाजिक परिस्थिती अनेक व्यक्तींनी बनलेली असते. या सामाजिक पास्थितीचा व्यक्तीवर जसा प्रभाव पडतो, तसाच व्यक्तीचाही सामाजिक परिस्थितीवर प्रभाव पडतो, ही सामाजिक आंतरक्रिया विविध स्तरावर चालू असते, सामाजिक अंतराचेचे तीन स्तर आहेत.

**(१) व्यक्ती - व्यक्तीतक आंतरक्रिया**

- जेव्हा आंतरक्रियेचे घटक दोन व्यक्ती असतात व त्या एकमेकांची दखल घेऊन एकमेकांना प्रभावीत करतात तेव्हा ती व्यक्ती-व्यक्तीतील आंतरक्रिया घडून येते. आई व तिचे, मूल शिक्षक व त्याचा विद्यार्थी, दुकानदार व गि-हाईक यांच्यातील आंतरक्रिया इत्यादी या आंतरक्रियांची असंख्य उदाहरणे देता येतील.

**२) व्यक्ती व समूह यांच्यातील आंतरक्रिया**

'जेव्हा व्यक्ती व समूह हे आंतररक्रियेचे दोन घटक असतात व ते एकमेकांना प्रभावित करतात, तेव्हा व्यक्ती व समूह यांच्यातील आंतरक्रिया अस्तित्वात येते. शिक्षक व त्याचा वर्ग, नेता व त्यांचे अनुयायी यांच्यातील आंतरक्रिया ही या आंतरक्रियाच उदाहरणे आहेत, व्यक्तीची आपल्या संस्कृती बरोबरही आंतरक्रिया चालु असते. संस्कृती म्हणजे ज्ञान, इच्छा, परंपरा, मूल्ये, नियमने, कौशल्य इत्यादी एक व्यवस्था होय. उदा. एखादा तरुण जेव्हा हुंडा घेण्याचे नाकारतो, तेव्हा तो संस्कृतीबरोबर अंतराक्रिया करत असतो.

**(3) समूहा-समूहातील आंतरक्रिया -**

जेव्हा समूह हेच आंतरक्रिएचे घटक असतात, तेव्हा समूहा-समूहातील आंतरक्रिया घडून येते. उदा. दोन राष्ट्रातील संघर्ष, दोन गटांतील मारामारी ही समूहा-समूहातील आंतरक्रियांची उदाहरणे होत.

## सामाजिक आंतरक्रियांचे प्रकार

आंतरक्रिया करणाऱ्या व्यक्लीच्या संपर्काचे स्वरूप, उद्धीष्ट्ये किंवा हेतू यांच्या आधारे सामाजिक आंतरक्रियांचे अनुक्रमे प्रत्यक्ष आंतरक्रिया संपर्क माध्यामाद्वारे होणारी आंतरक्रिया आणि अकेंद्रिभूत आंतरक्रिया व केंद्रिभूत आंतरक्रिया असे प्रकार सांगता येतील,

### अ) प्रत्यक्ष आंतरक्रिया (Direct Interaction)-

जेव्हा व्यक्ती वा समूहांचा प्रत्यक्ष किंवा साक्षात संपर्क येतो, तेव्हा घडून येणा-या आंतरक्रियांना प्रत्यक्ष आंतरक्रिया (Direct Interaction) असे म्हणतात. उदा. वर्गात असताना शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील प्रश्नोतरे किंवा कवायतीच्या पटांगणावर छात्रसेनेचा अधिकारी आणि छात्रसेनिकांची तुकडी यांच्यातील आंतरक्रिया हि प्रत्यक्ष आंतरक्रिया यांची उदाहरणे होत.

प्रत्यक्ष आंतरक्रिया घेऊन येण्यासाठी दोन किंवा अधिक व्यक्तींनी एकमेकांशी प्रत्यक्षात बोलले पाहिजे म्हणजेच त्यांच्यात शाब्दिक वर्तन झालेच पाहिजे असेही नाही. कारण शाब्दिक, वर्तनाप्रमाणेच मुद्राविष्कार आणि इतर शारीरिक हावभाव यासारख्या अशाब्दिक वर्तनाच्या (Non-Verball behavior) माध्यमांतूनही आंतरक्रिया साकार होऊ शकतात.

### ब) संपर्कमाध्यमाव्दारे होणारी आंतरक्रिया

**(Interaction through Communication media)**

सामाजिक आंतरक्रिया घडून येण्यासाठी आंतरक्रिया करणा-या घटकांत साक्षात, प्रत्यक्ष किंवा भौतिक दृष्ट्या समोरासमोरचा संपर्क येण्याची आवश्यकता असतेच असे मात्र नाही. अनेकदा अप्रत्यक्षपणे, कोणत्यातरी माध्यमातून व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती-समूह वा समूहा-समूहांत संपर्क प्रस्थापित होऊन त्यांच्यात आंतरक्रिया घडून येऊ शकते. अशा आंतरक्रियेला संपर्क माध्यमांवर होणार्या किंवा अप्रत्यक्ष आंतरक्रिया (Indirect interaction) असे म्हणतात. उदा. दोन भिन्न ठिकाणी राहणाऱ्या व्यक्तींनी पत्रव्यवहाराच्या माध्यमातून परस्पर संपर्क साधणे दोन व्यक्तीचे टेलिफोनवरील संभाषण पोलिस अधिका-यांनी वायरलेसवरून केलेले संभाषण हेही या प्रकारच्या अंतरक्रियांची काही उदाहरणे होत.

### क) अकेंद्रिभूत आंतरक्रिया -

अनेकदा दोन किंवा अधिक व्यक्ती केवळ एकमेकांच्या सान्निध्यात आल्यामुळे त्यांच्यात आंतरक्रिया घडून येतात, आंतरक्रिया करण्याचा हेतू मनाशी बाळगून त्या एकत्र आलेल्या नसतात, किंवा आंतरक्रिया जाणीवपूर्वक सुरु ठेवण्यांतही त्यांना रस नसतो. उदा. दवाखान्यातील प्रतीक्षागृहात डॉक्टरांनी

आत बोलावण्याची वाट पाहात बसलेल्या दोन अनोळखी व्यक्ती या व्यक्ती एकमेकांकडे पाहात असतात, परस्परांच्या कपड्यांचे, बाकावर बसण्याच्या त्यांच्या पद्धतीचे, त्यांच्या हालचालींचे निरीक्षण करीत असतात आणि दुसरेही असेच करीत असतात. या कारणामुळे आपापल्या वर्तनात ते आनुषंगिक बदल करीत असतात. हे सर्व कळत-नकळत अथवा जाणता-अजाणता घडत असते.

एर्वीन गॉफमन या समाजशास्त्रज्ञाने अशा आंतरक्रियाना 'अकेंद्रीभूत आंतरक्रिया ' (Unfocused Interactions) असे नाव दिले आहे. अकेंद्रीभूत आंतरक्रियाच्या म्हणजे अशी आंतरक्रिया की जी केवळ दोन किंवा अधिक - व्यक्ती एकमेकांच्या सातव्यात अयामुळे त्यांच्यात घडून येते. अवती- भवती असणाऱ्या इतरांचे निरीक्षण करणे आणि त्यांच्यावर आपका भोगल प्रभाव' पडावा एवढाच साधा हेतू यामागे असतो.

**ड) केंद्रीभूत आंतरराक्रिया** -

कैंद्रिभूत आंतरक्रियाचे चार मूलभूत प्रकार आहेत. त्यांचा थोडक्यात परिचय खालीलप्रमाणे आहे.
(१) विनमय (Exchange) :

आपल्याला काही पारितोषिक (reward) मिळावे किंवा कोणत्या ना कोणत्या स्वरुपात लाभ व्हावा, अगर मोबदला मिळावा या हेतूने जेव्हा परस्परांत आंतरक्रिया घडून येते तेव्हा तिचे स्वरुप विनिमयात्मक असते. पीटर ब्लाऊ या नावाच्या समाजशास्त्रज्ञाने तर विनिमयात्मक स्वरुपाची आंतरक्रिया ही एक मूलभूत सामाजिक प्रक्रिया असून ती सर्वत्र आढळते. असे म्हटले आहे. उपयुक्ततावादी विचाराने प्रेरित अशी ही आंतरक्रिया असते. आर्थिक व्यवसायात विनिमयाचे हे स्वरूप स्वच्छ दिसून येते. उदा. दुधवाला व गी-हाइक, मालक-मजूर यांच्यातील संबंध हे मूळत: विनिमयात्मक असतात.

सामाजिक आंतरक्रियाव्दारा मिळणारा लाभ नेहमीच पैशाच्या किंवा भौतिक स्वरूपाचा असत नाही तर अनेकदा भावनिक आणि सामाजिक पातळीचा असतो. उदा. एखादा सेवानिवृत शिक्षक झोपडपट्टीतील मुलांना मोफत शिक्षण देत असतो तेव्हा त्याला आर्थिक लाभ होत नाही, तर समाजातील गरजू व्यक्तीना मदत केल्याच्या उदात्य भावनांचा आनंद मिळतो. त्याचबरोबर त्या झोपडपट्टीतील मुलांना आणि इतर समाजातीय लोकांमध्ये शिक्षकांविषयी आदरभावना निर्माण होते. शिक्षकाला एक सामाजिक प्रतिष्ठा, मानसन्मान प्राप्त होतो.

(२) सहकार्य (Co-operation) - सहकार्य हा आंतरक्रियेचा असा प्रकार आहे की, ज्यात समान हितसंबंधाचे संवर्धन व्हावे किंवा समान उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी एकत्रित येऊन लोक संयुक्तरीत्या काम करतात. उदा. सर्व गावकरी मिळून शाळेची इमारत बांधणे रॉबर्ट निसबेट आणि रॉबर्ट पेरीन यांनी - सहकार्याचे चार प्रकार सांगितले आहेत.

(अ) स्वयंस्फुर्त सहकार्य - (Spontaneous co-operation) - विशिष्ट परिस्थतीमुळे असे सहकार्य घडून येते. उदा. चोरी करून पळ काढणा-या चोराला आजूबाजूच्या लोकांनी पकडून, पोलिसांच्या स्वाधीन करणे.

(ब) परंपरागत सहकार्य - (Traditional co-operation) - सहकार्यात्मक स्वरूपाचे जे वर्तन प्रकार परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित झालेले असतात. त्यांना परंपरागत सहकार्य असे म्हणतात, उदा. 'फंड पद्धती' याद्वारे सार्वजनिक कार्य पार पाडले जाते.

(क) पूर्वनियोजित नेतृत्व प्रधान सहकार्य - (Directed - co-operation) या प्रकारात अधिकाराच्या पदावर असणाऱ्या काही व्यक्तींच्या नियंत्रणाखाली समान उद्दिष्टांच्या प्राप्तीसाठी सामूहिक प्रयत्न करण्यात येतात, हे सहकार्य पूर्वनियोजित असते. आणि त्याला नेतृत्वाची आवश्यकता असते. उदा. उपग्रह अंतरिक्षात सोडण्यासाठी तज्ज्ञ संशोधक शास्त्रज्ञाच्या नियंत्रणाखाली व त्यांच्या मार्गदर्शनाखाली अन्य शास्त्रज्ञांनी एकत्र काम करणे.

(ड) करार प्रधान सहकार्य (Contractual co-operation) हेही सहकार्य पूर्वनियोजीत असते. विशिष्ट व्यक्तीनी समान असे विशिष्ट उदिष्ट गाठण्यासाठी विशीष्ट काम करण्याची स्पष्ट हमी दिलेली असते. त्यासाठी लेखी करार केला जातो उदा. भारत सरकार आणि परराष्ट्रीय कंपण्यां यांच्या सहकार्यातून विद्युतनिर्मिती करण्याबाबतचा करार केला जातो. याला करारप्रधान सहकार्य म्हणतात.

(क) स्पर्धा (competition) - मर्यादित अगर दुर्मिळ वस्तू आपल्यालाच मिळाव्यात यासाठी अनेक इच्छूक लोक नियमांना अनुसरून जेव्हा प्रमाणात गुंतलेले असतात तेव्हा स्पर्धा आस्तित्वात येते. स्पर्धा ही नियमाला धरून केली जाते. परंतु स्पर्धेचे नियम जेव्हा मोडले जातात तेव्हा संघर्ष आसित्वात येतो. आजचे युग हे स्पधेचे युग आहे. खेळ, शिक्षण, व्यवसाय, व्यापार राजकारण सर्वच क्षेत्रांमध्ये स्पर्धा पहावयास मिळते. स्पर्धेचे काही धनात्मक वा - सकारात्मक तर काही नकारात्मक असे व्यक्तीगत तसेच सामाजिक परिणाम आहेत.

(ड) संघर्ष (Conflict) - ही सहकार्याच्या विरुद्ध अशी सामाजिक प्रक्रिया असून संघर्षात व्यक्ती मौल्यवान किंवा दुर्मिक वस्तू केवळ आपल्याला मिळावी यासाठी परस्परांत झगडत असतात. संघर्षात स्वतःला फायदा मिळावा म्हणून प्रतिपक्षला हानी पोहोचविण्याचा किंवा त्याचा बीमोड करण्याचा प्रयत्न होतो. परस्पराविरोधी हितसंबंध व मुल्ये आणि मर्यादित अशी साधनसंपत्ती वा पारितोषिके यामुळे समाजातील व्यक्तीत वा समूहांत संघर्ष घडून येतो. संघर्षात सत्तेचे संपादन करण्याचा प्रयत्न होतो. तसेच तिचा इतरांवर वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी वापर होतो. संघर्षाची परिणती एका पक्षाच्या पराभवान किंवा मानहानीत, प्रसंगी हिंसाचारहि घडून येतो, असे संघर्ष नकारात्मक परिणाम करतात. काही संघर्षाचे सकारात्मक पारिणाम होतात, लेविस कोसर या समाजशास्त्रज्ञाने दाखवून दिले आहे की, दुस-या समूहाबरोब संघर्षामुळे समूहांतर्गत ऐक्य वाढीस लागते. तसेच संघर्षामुळे सामाजिक परिवर्तन ही घडून येऊ शकते. अर्थात विकोपाला गेलेल्या संघर्षाचे नकारात्मक परिणाम (negative, consequences) समाजाच्या ऐक्यास घातक असतात.

## सामाजिक अंतरक्रियांचे महत्व-

- सामाजिक आंतरक्रिया ही अत्यंत महत्वाची सामाजिक प्रक्रिया आहे. व्यक्ती व्यक्तीत आंतरक्रियातूनच समाजाची निर्मिती होते. समाज म्हणजे परस्पर संबेधांचे जाळे होय, हे संबंध समाजातील विविध व्यकतीत वेळोवेळी होणाऱ्या सामाजिक आंतरक्रियामुळेच शक्य होतात. सामाजिक आंतरक्रियामुळेच व्यक्तीची समाजीकरणाची प्रक्रिया घडून येते. तसेच व्यक्तीची 'स्व' संकल्पना विकसित होते आणि तिच्या ममत्वाचा विकास घडून येणे शक्य होते. सामाजिक आंतरक्रियामुळे संस्कृतीचे सातत्य टिकून राहते. सामाजिक आंतरक्रियांमुळे व्यक्ती आणि समाजाला वा समूहाना आपापली उद्दिष्टे साध्य करून घेता येतात. सामाजिक आंतरक्रियामुळे समाजाचे संघटन, आणि ऐक्य आबाधित राहते. म्हणूनच सामाजिक आंतरक्रिया संपूर्ण सामाजिक जीवनाचा आधार आहे.

## समाज (Society)

अरिस्टॉटल, या प्रसिद्ध ग्रीक तत्वज्ञांच्या मते 'मनुष्य' हा एक सामाजिक प्राणी आहे? मनुष्य एकटा आलिप्त एखादया बेटासारखा राहत नाही. त्याला स्वतःच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आली स्वताचे अस्तित्व टिकविण्यासाठी इतरांशी संबंध प्रस्तापित करून राहावे लागते. तथापि, मानवा मानवांच्या परस्पर संबंध व्यवस्थेला अथवा स्थितीला समाज म्हटले जाते. समाज करून राहण्याची प्रवृती केवळ मानव प्राण्यांतच असते असे नाही. तर मानवेत्तर प्राणी सुद्धा समाज करून राहातात. परंतु मानव समाजास मानवेत्तर प्राण्यांपेक्षा श्रेष्ठ समाज आहे. कारण मानवेत्तर प्राण्याची भाषा, संस्कृती, मूल्ये नीतीतत्वे, अर्थव्यवस्था, धर्मसंस्था इत्यादी मानवेत्तर प्राण्यांच्या तुलनेत श्रेष्ठ तसेच प्रगल्भ आहेत.

### समाजाची व्याख्या

(१) राईट यांच्या मते, "लोकांच्या गटाला समाज म्हटले जात नाही तर समूहांतर्गत असलेल्या व्यक्तींच्या संबंध व्यवस्थेला समाज म्हटले जाते.

(२) मॅकायव्हर व पेज यांच्या मते, "समाज म्हणजे सामाजिक संबंधा जाळे होय"

(3) डॉ मॉरिस गिन्सबर्ग म्हणतात, "विशिष्ट संबंध आणि वर्तनाचे प्रकार यांनी एकत्रीत बांधल्या गेलेल्या व्यक्तीचा समूह म्हणजे समाज होय"

यामुळे अशा तऱ्हेचे संबध न ठेवणाऱ्या किंवा दुसरे वर्तनाचे प्रकार आचरणाऱ्या व्यक्तीपासून त्या समाजातील व्यक्ती वेगळ्या दिसतात"

### सामाजिक संबंधाचे स्वरूप -

समाज ही संकल्पना पूर्णपणे व्यक्तींच्या सामाजिक संबंधाच्या व्यवस्थेवर निर्धारलेला असल्याने सामाजिक संबंधाचे स्वरूप समजावून घेणे आवश्यक ठरते.

(१)सामाजिक संबंध हे भौतिक संबंधातून भिन्न असतात- म्हणून सामाजिक संबंध हे मानसिक स्थितीवर अवलंबून असतात. म्हणून सामाजिक संबंध हे भौतिक संबंधातून सर्वथैव भिन्न असतात. अग्नि व त्यातून निघणारा धूर, पाणी व त्यावर चालणारी नांव यांचे परस्परांशी असणारे संबंध भौतिक स्वरूपाचे असतात. भौतिक संबंधामध्ये एकमेकांशी संबंध येणाऱ्या दोन किंवा अधिक निर्जिव वस्तूंपैकी कोणत्याही एका वस्तूला इतर वस्तूच्या अस्तित्वाबद्दलचे भान असत नाही. परंतु सामाजिक संबंधात व्यक्तीना परस्परांच्या अस्तित्वाचे भान असते.

(२) सामाजिक संबंधात व्यक्तीच्या अस्तित्वाचे परस्परांना भान असते - संबंध येणाऱ्या व्यक्तींच्या अस्तित्वाचे परस्परांना भान असणे हे सामाजिक संबंधाचे प्रमुख लक्षण असल्याने विविध तऱ्हेचे सामाजिक संबंध सर्वत्र आढळून येतात. उदा० आईव मूले, पती व पत्नी, मालक व नोकर इत्यादीचे अन्योन्य संबंध सामाजिक संबंधाचेच विभिन्न प्रकार आहेत. त्याचे आपण 9 आर्थिक, राजकीय, धार्मिक, व्यक्तीगत अशा अनेकरितीने वर्गीकरण करतो.

(३) सामाजिक संबंध सहकार्यात्मक असतात - सामाजिक संबंध सहकार्यात्मक तसेच संघर्षात्मक वृतीवर भर देणारे असतात. संघर्षात्मक संबंधात शत्रुत्वाची किंवा दुसऱ्याचा विनाश करण्याची भावना प्रामुख्याने असते. असे असले तरी समाजामध्ये सहयोगावर आधिष्ठीत झालेले संबंध मोठ्या प्रमाणावर दिसून येतात. सामाजिक संबंधामागे एकत्वाची किंवा आपलेपणाची भावना प्रकर्षाने आढळून येते. परंतु अशा प्रकारची भावना, प्रवृती नसेल तर सामाजिक संबंधामधून चिरस्थायी स्वरुपाच्या सामाजिक संस्था अगर समूह निर्माण होणार नाहीत.

(४) सामाजिक संबंधाची नितांत आवश्यकता - सामाजिक संबंध खेरिज मनुष्याला जगता येणे शक्य नाही. सामाजिक संबंधावर आधारलेल्या मनुष्याला आपल्या गरजा भागविता येतात. विकास साधता येतो व जीवनाचा आनंद उपभोगता येतो. म्हणून एकांतवास मनुष्याला भयप्रद वाटतो. 'मनुष्य हा एक सामाजिक प्राणी आहे' या ॲरिस्टॉटलच्या प्रसिद्ध वचनाचा हाच अर्थबोध होतो की, मनुष्याचे जीवन सामाजिक संबंधावरच अवलंबून असते.

(५) सामाजिक संबधामध्ये एखादी व्यवस्था अगर पद्धती असते - सामाजिक संबंधामध्ये एखादी व्यवस्था असते. तेव्हाच त्या संबंधाना समाज म्हटले जाते. सामाजिक संबध आशा या व्यवस्थेमुळे समाजाला एखादी निश्चित रचना प्राप्त होते. या निर्धारित रचनेमुळे ज्या व्यक्तींचा मिळून समाज निर्माण झालेला असतो, त्या समाजाचे असे स्वतंत्र आस्तीत्व निर्माण होते. आणि समाजाला सातत्य प्राप्त होते. समाज हा एखाद्या घरासारखा असतो. दगडविटा लाकुड इ. वस्तू मिळून घर तयार होत असले तरी घराची विक्षीष्ट अशी रचना असते. व त्या घराला स्वतंत्र असे आस्तित्व प्राप्त होते. समाज देखील अनेक व्यक्तींचा असला तरी त्यांच्या परस्पर संबंधाची व्यवस्था केल्याशिवाय समाज तयार होत नाही.

## समाजाची वैशिष्ट्ये

### १) निश्चित भू-प्रदेश -

कोणताही समाज हा प्रादेशिक समूह, असतो. व्यक्तीमध्ये स्थिर, स्थायी व सातत्यपूर्ण असे सामाजिक संबंध निर्माण होण्यासाठी व्यक्ती विशिष्ट प्रदेशात वास्तव्य करून राहिल्या पाहिजेत. काही भटके समाज एके ठिकाणी वास्तव्य न करता सारखे भटकत असतात, परंतु या भटकंतीला विशिष्ट प्रकारचे बंधन असते. अशा भटक्या समाजात अनेक व्यक्ती नेहमीच परस्परांच्या सान्निध्यात राहत असतात. तेव्हा प्रत्येक समाजाला स्वतःच्या कार्यक्षेत्रापुरता निश्चित प्रदेश असतो.

### (२) प्रजोत्पादन -

समाजामध्ये नवीन व्यक्ती सामावून घेण्याचा प्रजोत्पादन हाच मुख्य मार्ग आहे. कोणत्याही समाजातील व्यक्तीची संतती त्याच समाजात राहते. सामान्यपणे याच मार्गाने समाजाची सभासद संख्या वाढत असते, जिंकून आणलेल्या किंवा गुलाम म्हणून आणलेल्या लोकांमुळे समाजातील सभासद संख्या वाढते हे खरे असले तरी हा मार्ग स्थायी स्वरुपाचा नसतो. आणि या मार्गाने होणाऱ्या सदस्य संख्ये-तील वाढ अगदीच अल्प असते. तेव्हा समाजात होणाऱ्या प्रजोत्पादनावरच समाजाची सभासद संख्या प्रामुख्याने अवलंबून असते

### (3) व्यापक संस्कृती -

प्रत्येक समाजाची व्यापक अशी वेगळी संस्कृती असते. डॉ. इरावती कर्वे यांच्या मते, "संस्कृती म्हणजे जीवन जगण्याची विशिष्ट रीत होय" ज्यामध्ये त्या समाजाच्या नीती, रीतिरीवाज, आचार-विचार, ज्ञान, धर्म, कल्पना, प्रतिबिंबीत झालेल्या असतात. थोडक्यात समाजाची संस्कृती व्यापक असते. सामाजिक जीवनास व्यापक अशा विविध गोष्टी पुरविण्यास त्या समाजाची संस्कृती समर्थ असते. समाज संस्कृतीदृष्ट्या स्वयंपूर्ण किंवा आत्मनिर्भर असतो. या अर्थाने प्रत्येक समाजाची संस्कृती व्यापक असते.

**(४) स्वतंत्रता -** समाज हा स्वतंत्र समूह असतो. तो कोणत्याही दुसऱ्या समाजाचा भाग म्हणून राहत नाही. समाज राजकीयदृष्टया दुसऱ्या समाजाच्या अंकित असला तरी तो स्वतःला विजेत्या समाजाचा भाग मानीत नाही. ब्रिटिशांनी हिंदू स्थानावर जवळ जवळ दीडशे वर्षे राज्य केले. पण भारतीय समाज हा स्वतंत्र समाज होता. तो इंग्लीश समाजाचा भाग म्हणून ओळखला गेला नाही.

**(५) समाजाच्या मूलभूत मरता -(Basic needs of societies)** सर्व समाजांना आपले अस्तित्व टिकविण्यासाठी काही समान गरजा भागवाव्या लागतात. नाहीतर ते समाज टिकणार नाहीत. समाज कोणत्याही प्राण्यांचा असो, कोणत्याही परिस्थितीचा असो, त्याच्या अस्तित्वासाठी काही आवश्यक गरजा भागविणे अनिवार्य असते, म्हणूनच अशा गरजा समाजाच्या मूलभूत गरजा असे म्हणतात.

श्री किंग्जले डेव्हिस यांनी या गरजांचे वर्गीकरण खालील प्रमाणे केले आहे.

**अ) प्राण्यांच्या निर्वाहविषयक गरजा - (Needs for maintenance of population)** समाज हा जीवंत प्राण्यांचा बनलेला असतो. या प्राण्यांच्या निर्वाध विषयक गरजा काही मूलभूत आहेत आणि त्या पूर्ण करणे आवश्यक असते.

१) जीव-पोषण- समाजाला जीवसंख्येच्या आहाराची व पोषणाची योग्य तरतूद करावी लागते. त्यासाठी समाज नैसर्गिक साधनसामुग्रीचा उपयोग करून घेतो व अशा रीतीने उपलब्ध असलेल्या उत्पादनाची सर्व जीवांसाठी विभागणी करण्याचा प्रयत्न करतो.

२) जीव-रक्षण- समाजाला जीव रक्षणाची देखील तरतूद करावी लागते. कारण जीवांना नेहमीच आपत्तींना तोंड द्यावे लागते. तसेच परजीवी किंवा परभक्षी शत्रूशी सामना करावा लागतो. त्यांच्यापासून जीवांचे रक्षण करणे समाजाला आवश्यक असते.

३) प्रजोत्पादन - अनेक कारणांनी कमी होणारी लोकसंख्या भरून काढण्यासाठी प्रजोत्पादनाची व्यवस्था समाजाला करावी लागते. थोडक्यात, समाजाच्या अस्तित्वासाठी आवश्यक अशा ह्या गोष्टींची तरतूद करण्याचे सर्व प्राण्यांचे मार्ग भिन्न असतात. या तीन गोष्टींची तरतूद करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा असते. सामूहिक सहयोगावर ती यंत्रणा आधारलेली असते. त्यामुळेच समाजव्यवस्था टिकून राहते.

**ब) समाजाच्या कार्य-विभाजनासंबंधीच्या गरजा -(Needs for Division-of Population)**

समाजातील प्राण्यांच्या निर्वाहविषयक गरजांची पूर्ती करणे, हे प्रत्येक समाजाचे उद्दिष्ट असते, यासाठी समाजातील प्रत्येक व्यक्तीला कोणते ना कोणते तरी कार्य करावे लागते. प्रत्येक व्यक्तीचे कार्य एकाच स्वरूपाचे असते असे नाही. त्यामुळे व्यक्ती व्यक्तीमध्ये सहकार्य 'ठेवून व्यक्तीने कोणते कार्य करावयाचे याविषयीचे विभाजन करणे प्रत्येक समाजाला अगत्याचे असते. समाजाच्या आसीत्वासाठी समाजाच्या अनिवार्य गरजा पुऱ्या करणे अटळ असल्याने त्यासाठी कार्य विभाजनाची व्यवस्था करणे जरूरीचे असते.

**क) समाजाचे दृढ ऐक्य वाढविणाऱ्या गरजा (Needs for Solidarity, of the Solidarity)**

समाजाचे अस्तित्व व सातत्य अबादित राहावे यासाठी समाजातील सभासदांमध्ये ऐक्य व दृढ संबंध प्रस्थापित करण्याची गरज असते. सभासदांमध्ये वन्यभाव निर्माण होण्यासाठी या सभासदांचा एकमेकांशी संपर्क असण्याची गरज आहे. तसेच समाजाच्या सभासदांमध्ये परस्परांविषयी सहिष्णुता असणे जरूरीचे असते. त्याचबरोबर एका समाजाचे सभासद इतर समाजातील सभासदांपेक्षा वेगळे आहेत. हे स्पष्ट करण्यासाठी काही व्यवस्था करणे जरुरीचे असते. त्यामुळे आतर्गत ऐक्य निर्माण करण्यास जबरदस्त चेतना मिळत असते.

**ड) समाजाचे सातत्य टिकविणाऱ्या गरजा (Needs for continuity of the Society)**-

समाज लवकर नष्ट होता कामा नये अगदी कमीत कमी काही पिढ्यातरी तो राहिला पाहिजे, समाजाची निरंतरता राखावी लागते. म्हणजे समाजाची रचना व स्वरूप चालू राहिल याची दक्षता घ्यावी

## समाजाचे प्रकार (Types of societies)

कोणत्याही प्राण्यांच्या समाजांना स्वतःचे अस्तित्व टिकविण्यासाठी काही आवश्यक गरजा भागवाव्या लागतात. आवश्यक गरजा भागविण्याच्या भिन्न पद्धतींच्या अनुरोधाने समाजाचे किंग्जले डेव्हिस यांनी पुढील दोन प्रकारांत वर्गीकरण केले आहे.

### (अ) जैव-सामाजिक समाज (Bio - Social society) –

ज्या समाजातील प्राण्यांच्या गरजा, त्यांचे कार्य व त्यांच्यामधील परस्पर संबंध हे जैव-घटकांनी, निर्धारित झालेले असतात, त्या समाजांना जैव-सामाजिक समाज असे म्हणतात. जैव-सामाजिक समाजाची सम्यक कल्पना येण्यासाठी त्या समाजातील प्राण्यांची अनुवंशीक यंत्रणा समजून घेतली पाहिजे. आनुवांशिकतेच्या तंत्रानुसारच जैव- सामाजिक समाजामधील प्राण्यांच्या गरजा, त्यांचे कार्य व परस्पर संबंध ठरत असतात. त्यांच्यातील गुणधर्म एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे आनुवंशिकतेने येत असतात. मुंग्याचा समाज व पक्ष्यांचा समाज यांच्यामध्ये कितीतरी फरक आहे. मुंग्याच्या समाजात विस्तारपूर्वक श्रम-विभाजन दिसून येते. परस्परांमध्ये घनिष्ट सहचार्य आढळते. आणि सर्वांनी मिळून निर्माण केलेले पर्यावरण असते. परंतु पक्ष्यांच्या समाजात सहचारावर आधारलेल्या या गोष्टी कमी प्रमाणात असतात व वैयक्तिक आचरणाला बरीच मोकळीक असते.

जैव-सामाजिक समाजातील गरजांची पूर्ती आनुवंशिक तंत्रानुसार होत असते. त्यामुळे जगाच्या पाठीवर कोठेही असलेल्या विशिष्ट प्राणी वर्गातील प्राण्यांचे वर्तन समानच आढळून येते. चिमण्यांनी विणलेली अप्रतिम घरटी ही कोठेही व केव्हाही एकाच स्वरूपाची असतात. त्याचबरोबर त्यांचे एकमेकांशी संपर्क साधण्याची पद्धती त्यांच्या सहजप्रवृतीने ठरत असल्याने त्यांच्यामधील कोणतेच बदल दिसून येत नाही.

### ब) सामाजिक-सांस्कृतिक समाज (socio-Culture society)

समाजात घटकांच्या गरजा, घटकांचे कार्य व त्यांचे परसार संबंध जैव-पद्धतीने न होता संस्कृतीद्वारे निर्धारित होत असतात, त्या समाजाला सामाजिक-सांस्कृति समाज असे म्हणतात. मानवी समाजाच्या असणाऱ्या सर्व मूलभूत व अन्य गरजांची पूर्वी जैव-सामाजिक समाजाप्रमाणे, उपजत प्रवृती प्रमाणे, अनुवंशिक तंत्र पद्धतीने होत नसते. मानवांच्या मूलभूत गरजांचे स्वरूप समान असूनही मानवी समाजात विविधता आढळते. भोजनपध्दती, केश-भूषा वेशभूषा घरे बांधण्याची पद्धती व एकूण वर्तन प्रकार या बाबतीत सर्व मानवी समाजात साम्य नसते, याचे कारण म्हणजे विविध मानवी समाजात संस्कृतीचे स्वरूपही भिन्न भिन्न असते. काळाबरोबरच अधिक प्रगत मार्गांचा वापर गरजापूर्तीसाठी केला जात असतो. म्हणून विशिष्ट समाजातील सांस्कृतिकत व्यवस्थेमध्ये वेळोवेळी मूलभूत अर्थाने बदल होत असतात. मानवाची मज्जासंस्था, शिक्षणक्षमता, तर्कशक्ती, पाठीचा ताठ कणा हातांची व बोटांची विशिष्ट

रचना इत्यादी जैविक क्षमता इतर प्राण्यांपेक्षा 'अफाट' आहे. त्यामुळेच मानवाने संस्कृतीची निर्मिती केली. संस्कृतीच्या साहाय्याने मानवाने आपल्या गरजा पूर्ण केल्या. समाजाचा विकास साधला संस्कृतीचे हस्तांतरण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे करून गरजापुर्तीची निरंतर परंपरा चालू ठेवली. संस्कृतीच्या घटकांत वेळोवेळी परिवर्तन करून समाज जीवन अधिक सुंदर करण्याचे प्रयत्न केले जातात.

**मानव समाजाची वैशिष्टये** -

**१) विशिष्ट कार्यासाठी शिक्षण -**

मानव समाज आपल्यातील व्यक्तींना विशिष्ट कार्यासाठी शिक्षण देऊन तयार करतो. समाजातील विविध कार्ये पार पाडण्यासाठी भिन्न-भिन्न व्यक्तीची गरज असते, आणि त्यांच्यामध्ये कामाची विभागणी करावी लागते. तसे पाहिले तर श्रमविभाजन हे केवळ मानव समाजातच असते असे नाही, तर मानवेत्तर समाजातही ते असते. परंतु मानवेत्तर समाजातील श्रमविभाजन हे अनुवांशिकतेने मिळालेल्या शारीरिक गुणधर्मावर आधारलेल असते. तसेच त्यांचे कार्यही अनुवंशिक तंत्रावर अवलंबून असते. त्यासाठी त्यांना शिक्षण घेण्याची गरज नसते. पण मानव समाजात विशिष्ट कार्य पार पाडण्यासाठी त्यासंबंधीचे शिक्षण घ्यावे लागते.

**२) काम प्रवृतीचे नियमन** -

मानव मानवेत्तर प्राण्यांच्या समाजात काम प्रवृती ही नैसर्गिक सहज प्रवृती आहे. मानवेत्तर प्राण्यांतील काम प्रवृत्ती वर्षातील काही काळापुरती मर्यादित असते. शिवाय नर-मादीच्या मिलनाबाबत विशिष्ट बंधने आढळत नाहीत. मानव प्राण्यांमध्ये कामप्रवृती ही निरंतरपणे वास करित असते. तसेच मानव-समाजात कामप्रवृतीच्या पूर्तीबाबत काटेकोर नियम असतात. व्यक्तींचे वैयक्तिक वर्तन ही एक सामाजिक व नैसर्गिक बाब आहे. साहजीकच विवाह या समाजमान्य नियमाव्दारेच स्त्री-पुरुषांनी कामवासनांची तृप्ती केली पाहिजे, यासाठी मानव समाज नेहमीच दक्ष असतो. अर्थात कामप्रवृतीचे नियमन हे केवळ मानव समाजातच दिसून येते.

**३) सांकेतिक निवेदनाची व्यवस्था -**

मानव समाज सांकेतिक निवेदनाची व्यवस्था करतो. भाषा, स्वभाव यादवारे आपले विचार, भावना मानव प्रकट करू शकतो. शिक्षण-ग्रहण क्षमता ही मानवाची उपजत प्रवृती असल्याने त्याने सांकेतिक निवेदनाची व्यवस्था आणि पर्यायाने एखादी भाषा याची हळूहळू वाढ केली. मनुष्य आपल्या अभिवृती ज्ञान भाषेच्या द्वारे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे देऊ शकला. परंतु मानवेत्तर प्राण्यात शिक्षण ग्रहण क्षमता मर्यादित असल्याने मानवेत्तर समाजात आणि भाषा या निवेदन साधनांचा अभाव असल्याने मानवेत्तर समाजात कोणत्याही प्रकारे परिवर्तन घडून आले नाही, परंतु मानवाला भाषेमुळेच ज्ञान देणे, भावना व्यक्त करणे, इतरांच्या मनात प्रेरणा निर्माण करणे. इत्यादी गोष्टी शक्य झाल्या आहेत.

### ४) आदर्शाची संकल्पना -

केवळ मानव समाजातच आदर्शाची संकल्पना आस्तित्वात आहे. व्यक्ती वर्तनाविषयी योग्य व अयोग्य, पवित्र-अपवित्र, शुभ-अशुभ अशा कल्पना मानव समाजातच दिसतात. मानव समाजातील विविध सामाजिक संस्थांची उभारणी या आदर्श तत्वांवरच झालेली आहे. स्त्री-पुरुषांचा समागम हा केवळ वैवाहिक संबधाने होणे हे नैतिक व योग्य मानले गेल्याने, विवाहबाहय संबंधांचा निषेध मानव समाजात केला जातो. लोकरूढी, लोकनिति, कायदा या नियमनात्मक साधनांची उभारणी आदर्श तत्वांवर समाजात झालेली असते. परंतु अशा त-हेची नियमनात्मक व्यवस्था मानवेत्तर समाजात नसते.